Journal of East-West Thought
ISSN: *2168-2259 (online)*
(*https://jetjournal.us/*)
Volume 15, Issue 2, April-June – 2025 Special Issue 1

Impact Factor: 7.665, Peer Reviewed and UGC CARE I

# प्राथमिक स्तरावरील इंग्रजी भाषा कौशल्य विकासासाठी ज्ञानरचनावादी अध्यापन पद्धतीच्या परिणामाचा अभ्यास

**श्रीमती. वैजयंती दंगल गुलाले,** संशोधक, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव
**डॉ. कैलास संतोष चौधरी,** सहयोगी प्राध्यापक, नंदुरबार तालुका विधायक समितीचे शिक्षणशास्त्र महाविद्यालय, नंदुरबार

## 1. प्रस्तावना:

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 1986 नुसार इंग्रजी विषय हा प्राथमिक स्तरावर अध्यापन केला जात नव्हता. इंग्रजी विषय हा इयत्ता पाचवी पासून म्हणजेच माध्यमिक स्तरापासून अध्यापन केला जात होता. मात्र काळानुरूप इंग्रजी भाषेचे वाढत जाणारे महत्त्व पाहून त्याचे अभ्यासक्रमात देखील महत्त्व वाढत गेले. इंग्रजी ही एक ग्लोबल भाषा असून ती जगातील ज्ञानाची देवाण-घेवाण करणारी प्रमुख भाषा आहे. संपूर्ण तंत्रज्ञान हे इंग्रजी भाषेतूनच अवगत होते. या सर्व गोष्टी लक्षात घेता महाराष्ट्र सरकारने एक महत्त्वपूर्ण निर्णय घेतला व डिसेंबर 2000 पासून इंग्रजी भाषेचा परिचय प्राथमिक स्तर इयत्ता पहिली पासूनच करून देण्याचे ठरवले. अशाप्रकारे इंग्रजी भाषेचा प्राथमिक स्तरावरील अभ्यासक्रमात इयत्ता पहिली ते चौथीच्या वर्गात समावेश करण्यात आला. प्राथमिक स्तरावरील विद्यार्थ्यांसाठी इंग्रजी भाषा ही संपूर्णपणे अनोळखी भाषा असते. म्हणून अभ्यासक्रम हा विद्यार्थी केंद्रित आणि विद्यार्थ्यांना सहज जमेल असा तयार करण्यात आला. इंग्रजी भाषेचा अभ्यासक्रम हा कौशल्यांवर आधारित आहे. यात भाषेच्या कौशल्य अध्ययनाला अत्यंत महत्त्व देण्यात आले आहे. भाषेची कौशल्य म्हणजे श्रवण, भाषण, वाचन, लेखन आणि संभाषण होत. ही कौशल्य वर्गातून व्यवस्थित साध्य व्हावीत म्हणून प्रत्यक्ष अभ्यासक्रमाचे अध्यापन सुरू करण्याआधी शासनाकडून शिक्षकांना ट्रेनिंग देण्यात आले आहे. त्यांना विद्यार्थी केंद्रीत अध्यापन कसे करावे याविषयी विविध प्रकारे मार्गदर्शन करण्यात आले आहे. अभ्यासक्रमात श्रवण, भाषण, वाचन, लेखन व संभाषण अशा कौशल्यांचा समावेश करण्यात आलेला आहे.

इंग्रजी भाषेचा अभ्यासक्रम कौशल्याधिष्ठीत सन 2000 सालापासून सुरू करण्यात आला आहे. अभ्यासक्रमामध्ये विविध बदल करण्यात आलेत. त्याचबरोबर अध्यापनाच्या विविध पद्धती देखील निर्माण करण्यात आल्या. त्यानुसार शिक्षकांना मार्गदर्शन करण्यात आले त्यांचे वेळोवेळी ट्रेनिंग घेण्यात आले. 2010 ला राज्य पातळीवर शालेय अभ्यासक्रम आराखडा तयार करताना ज्ञानरचनावादाचा आधार घेतला गेला. ज्ञानरचनावादी अभ्यासक्रमात दोन मुख्य उद्देश असतात

1. पूर्वी निर्माण केलेले ज्ञान आत्मसात करायला विद्यार्थ्यांना मदत करणे., आणि
2. विद्यार्थ्यांना भावी आयुष्यात उपयोगी पडेल असे ज्ञान, कौशल्य आणि वृत्ती विकसित करायला मदत करणे.

इंग्रजी भाषा ही संपूर्णपणे विद्यार्थ्यांसाठी अपरिचित असलेली भाषा आहे. त्यामुळे दुसरे उद्दिष्ट साध्य करणे थोडे अडचणीचे ठरते. इंग्रजी स्पेलिंग पाठांतर करणे किंवा उतारे पाठ करणे एवढेच पुरेसे नसून त्याचे वर्गीकरण करून संबोधाच्या स्वरूपात साठवून ठेवणे आवश्यक आहे. संबोध मधील साम्य-भेद समजून घेणे, त्यांचे परस्पर संबंध समजून घेणे, योग्य संदर्भात उपयोजन करणे, त्यांच्या नव्या संबंधाची कल्पना करणे. यांसारखी बोधात्मक कौशल्य आत्मसात केली तरच भावी काळात स्पर्धेच्या युगात आपल्या विद्यार्थ्यांचा


Copyright © | JET Network, All Rights Reserved

निभाव लागणार आहे. 'विद्यार्थ्यांनी स्व प्रयत्नातून ज्ञान निर्मिती करणे' हा ज्ञान रचनावादी अध्ययनाचा गाभा म्हटला तर तशाच तऱ्हेचे अध्ययन फार प्राचीन काळापासून पौर्वात आणि पाश्चिमात्य देशात घडत होते याचे काही पुरावे प्राचीन वाङ्मयातून विखुरलेले आढळून येतात.

वेदातील गोष्टी वाचताना असे लक्षात येते की स्वानुभवांचे पृथ्थकरण करताना विद्यार्थ्यांना पडलेले प्रश्न ते त्यांच्या गुरुजींकडे उपस्थित करत असतात आणि त्यावर चर्चा होऊन जे ज्ञान निर्माण होत असे तेच पुढे उपनिषदांत ग्रंथांत केले जात असे.

आश्रमातील शिक्षण पूर्ण झाल्यावर विद्यार्थ्यांना गुरुजी समाजात पाठवून विविध समस्यां वरची उत्तरे शोधायला सांगत असत. भगवान बुद्धांनी आपल्या शिष्यांना उपदेश करताना म्हटले होते 'अत्त दीप भव।' याचाच अर्थ असा की तूच तुझा मार्गदर्शक हो असा आहे.

इटालियन तत्त्वज्ञ जीआमबॅटीस्टा विको म्हणत असत की 'माणसाने जे ज्ञान स्वतः निर्मिले आहे तेवढ्याचेच त्याला आकलन होते'. या उदाहरणावरून आपल्या लक्षात येते की भूतकाळात विद्यार्थ्यांनी आपले ज्ञान आपण निर्माण करावे याचा आग्रह वारंवार धरला गेला आहे. ज्ञानरचनावादाचा आधुनिक युगातील आग्रह हा याच साखळीतील दुवा समजायला हवा. त्याचा अधिक काळजीपूर्वक परिचय करून घ्यायला हवा. पूर्वीच्या काळी गुरुगृही विद्यार्थ्यांकडून वेदांचे, श्लोकांचे पठण करून घेतले जात असे आणि भावी आयुष्यात त्यांना त्याचा उपयोग होत असे. प्राचीन शिक्षण पद्धतीच्या माध्यमातून भारताने अनेक वर्ष पाठांतराच्या मौखिक परंपरेद्वारा विशाल वैद्यक वाङ्मय सुरक्षित ठेवले. विविध शास्त्रात निपुण विद्वान निर्माण झाले. प्राचीन गुरु आपल्या शिष्यांना चालता फिरता विश्वकोश बनवायचा प्रयत्न करत असत. विविध शास्त्रातील प्रगती ही प्राचीन शिक्षण पद्धतीची फार मोठी देणगी मानली पाहिजे.

या पद्धतीचा इंग्रजी अध्ययन अध्यापनात ज्ञानरचनावादी पद्धतीने कशा प्रकारे उपयोग करून घेता येईल असा विचार संशोधिकेच्या मनात निर्माण झाला. पाठांतराच्या मौखिक परंपरेचा समावेश ज्ञानरचनावादी पद्धतींमध्ये करता येईल का? अशी शंका संशोधिकेच्या मनात निर्माण झाली. त्या दिशेने संशोधिकेने आपले काम सुरू केले.

प्रस्तुत संशोधनात संशोधिकेने पठन पद्धतीचा प्राथमिक स्तरावरील इंग्रजी भाषा कौशल्य विकासासाठी ज्ञानरचनावादी अध्यापन पद्धती म्हणून प्राथमिक शिक्षणात कशाप्रकारे उपयोग करता येईल याचा अभ्यास केला आहे.

**2. समस्या विधान :**

प्राथमिक स्तरावरील इंग्रजी भाषा कौशल्य विकासासाठी ज्ञानरचनावादी अध्यापन पद्धतीच्या परिणामांचा अभ्यास.

**3. उद्दिष्टे:**

प्रस्तुत संशोधनाची पुढील उद्दिष्टे निश्चित करण्यात आली होती.

1. प्राथमिक स्तरावरील विद्यार्थ्यांचा इंग्रजी कविता (rhymes) पाठांतरातून ज्ञानरचनावादी पद्धतीने इंग्रजी भाषा श्रवण कौशल्याचा विकास साधणे.
2. प्राथमिक स्तरावरील विद्यार्थ्यांचा इंग्रजी कविता (rhymes) पाठांतरातून ज्ञानरचनावादी पद्धतीने इंग्रजी भाषा संभाषण कौशल्याचा विकास साधणे.


Copyright © | JET Network, All Rights Reserved

Journal of East-West Thought
ISSN: *2168-2259 (online)*
*(https://jetjournal.us/)*
Volume 15, Issue 2, April-June – 2025 Special Issue 1

Impact Factor: 7.665, Peer Reviewed and UGC CARE I

3. प्राथमिक स्तरावरील विद्यार्थ्यांचा इंग्रजी कविता (rhymes) पाठांतरातून ज्ञानरचनावादी पद्धतीने इंग्रजी भाषा वाचन कौशल्याचा विकास साधणे.
4. प्राथमिक स्तरावरील विद्यार्थ्यांचा इंग्रजी कविता (rhymes) पाठांतरातून ज्ञानरचनावादी पद्धतीने इंग्रजी भाषा लेखन कौशल्याचा विकास साधणे.
5. प्राथमिक स्तरावरील विद्यार्थ्यांचा इंग्रजी कविता (rhymes) पाठांतरातून ज्ञानरचनावादी पद्धतीने इंग्रजी भाषा आकलन व उपयोजन कौशल्यांचा विकास साधणे.

**4. परिकल्पना :**

विद्यार्थ्यांच्या भाषा कौशल्य विकासाच्या पूर्व चाचणी व उत्तर चाचणीतील गुणात सार्थक फरक आढळत नाही.

**5. संशोधन पद्धती :**

प्रस्तुत संशोधनात ज्ञानरचनावादी पद्धतीचा परिणामकारकतेचा अभ्यास करावयाचा असल्याने प्रायोगिक संशोधन पद्धतीची निवड करण्यात आली होती.

**6. जनसंख्या:**

प्रस्तुत संशोधनासाठी संशोधिकेने जिल्हा परिषद प्राथमिक शाळा अंजनविहिरे तालुका शिंदखेडा जिल्हा धुळे येथील प्राथमिक शाळेत अध्ययन करणारे सर्व विद्यार्थ्यांचा समावेश जनसंख्या म्हणून निश्चित करण्यात आली होती. इयत्ता पहिले ते इयत्ता चौथीत अध्ययन करणारे एकूण १२५ विद्यार्थी आहेत. हे सर्व विद्यार्थी प्रस्तुत संशोधनाची जनसंख्या म्हणून निश्चित करण्यात आली होती.

**7. न्यादर्श:**

प्रस्तुत संशोधनासाठी जनसंख्येतून न्यादर्श निवडण्यासाठी यादृच्छिक पद्धतीने नमुना निवड करण्यात आली. त्यात जिल्हा परिषद शाळा अंजन विहिरे येथील इयत्ता पहिली ते पाचवी पर्यंत एकूण पाच वर्ग असून लॉटरी पद्धतीने त्यातील एका वर्गाची निवड करण्यात आली. यदृच्छिक पद्धतीने इयत्ता चौथीच्या वर्गाची निवड झाली नमुना म्हणून करण्यात आली. इयत्ता चौथीत एकूण 35 विद्यार्थी असून यात 16 मुली व 19 मुले आहेत.

**8. संशोधन अभिकल्प :**

प्रस्तुत संशोधनासाठी एकल गट पूर्व व उत्तर चाचणी अभिकल्प संशोधनासाठी वापरण्यात आला होता.

**9. संशोधन साधने:**

प्रस्तुत संशोधनासाठी संशोधिकेने तयार कलेली वस्तुनिष्ठ स्वरूपाची पूर्व चाचणी व उत्तर चाचणीचा उपयोग करण्यात आला.

**10.संख्याशास्त्रीय परिमाणे** :-

प्रस्तुत संशोधनासाठी शेकडेवारी मध्यमान, प्रमाण, विचलन व 't' मूल्य या संख्याशास्त्रीय परिमणांचा उपयोग करण्यात आला.

**11. माहितीचे संकलन व संशोधन प्रक्रिया :-**

जिल्हा परिषद शाळा अंजनविहीरे येथील इयत्ता चौथीच्या 35 विद्यार्थ्यांच्या इंग्रजी भाषा कौशल्यावर आधारित एकूण 30 मार्कांची पूर्व चाचणी घेण्यात आली. त्या गुणांची वस्तुनिष्ठपणे नोंद घेतली.


Copyright © | JET Network, All Rights Reserved

Journal of East-West Thought
ISSN: *2168-2259 (online)*
*(https://jetjournal.us/)*
Volume 15, Issue 2, April-June – 2025 Special Issue 1

Impact Factor: 7.665, Peer Reviewed and UGC CARE I

त्यानंतर त्या इयत्ता चौथीच्या विद्यार्थ्यांकडून कडून एकूण 25 इंग्रजी कविता (rhymes) पाठांतर करून घेण्यात आल्या. यामध्ये काही दुसरीच्या अभ्यासक्रमातील, तिसरीच्या अभ्यासक्रमातील, व चौथीच्या अभ्यासक्रमातील आणि काही अभ्यासक्रमाबाहेरील कवितांचा समावेश करण्यात आला होता. जिल्हा परिषद शाळा अंजनविहिरे येथील इयत्ता चौथीच्या विद्यार्थ्यांकडून खालील प्रमाणे कविता पाठांतर करून घेण्यात आल्या-

| No. | Name of the Poem |
|---|---|
| 1 | Good morning good morning |
| 2 | Bounce Ball to Reena |
| 3 | Zoom zoom zoom |
| 4 | Tony tinkar |
| 5 | Humpty Dumpty |
| 6 | Fun time play time |
| 7 | Can you hope |
| 8 | A little seed |
| 9 | Oh where do you come from |
| 10 | 10.roti in the pan |
| 11 | Fuji vaji caterpillar |
| 12 | White ship white ship |

| No. | Name of the poem |
|---|---|
| 13 | Meri had a little lamb |
| 14 | Fry a pancake |
| 15 | This is the map of tiny town |
| 16 | Little brown Sparrows |
| 17 | Found a peanut |
| 18 | Hush baby my dolly |
| 19 | Row row your bot |
| 20 | Happy birthday to you |
| 21 | Hen hen count ten |
| 22 | A B C D E F G |
| 23 | We all joining circle |
| 24 | wheat Jawar and bajara grow |

या कविता विद्यार्थ्यांकडून पाठांतर करून घेतल्या नंतर विद्यार्थ्यांना त्या इंग्रजी उच्चारांसह लेखन करण्यास सांगितल्या. कविता पाठांतरातून मुलांना कुठल्या शब्दाचा उच्चार काय आहे ते अचूक समजवाले. त्या शब्दांचे अचूक व योग्य प्रकारे उच्चार कसा करावा हे विद्यार्थ्यांना कशा प्रकारे समजेल ते पाहीले. त्यांचे इंग्रजी pronunciation सुधारण्याकडे लक्ष देण्यात आले. त्यांच्या इंग्रजी शब्द संपदेत भर पाडण्याचा प्रयत्न केला. त्या कवितातील शब्द वापरून ते वेगळ्या प्रकारचे वाक्यरचना कशी करता येऊ शकते याचे मार्गदर्शन करण्यात आले. या कवितेततील वाक्यांचे ऊच्चार त्या त्या ओळी खाली विद्यार्थ्यांकडून लिहून घेण्यात आलेत. यातून त्यांचे इंग्रजी स्पीकिंग स्किलस् कसे सुधारेल याकडे लक्ष देण्यात आले. प्रत्येक विद्यार्थ्याचे उच्चार योग्य आहेत की नाही याची काळजी घेतली. अशाप्रकारे त्यांच्या इंग्रजी शब्दांचे अर्थ डिक्शनरीतून शोधण्यासाठी त्यांना प्रोत्साहित केले. यातून इंग्रजी डिक्शनरी चा वापर कसा करावा त्यातून स्पेलिंग, त्याचा अर्थ कसे शोधावे याचे मार्गदर्शन केले. त्यातून त्यांच्या इंग्रजी शब्दसंपदेत भर पडेल असे पाहीले. तसेच इंग्रजी भाषेतील संवाद देखील ते आपसात साधतील या प्रकारचे संवाद कसे तयार होतात याचे त्यांना मार्गदर्शन करण्यात आले, विद्यार्थी स्वतः कवितेतील संवाद शोधतील यासाठी त्यांना प्रोत्साहित केले. यातून त्यांचे speaking skills सुधारण्याकडे लक्ष दिले. इंग्रजी कविता पाठांतरातून त्यांचे इंग्रजी उच्चार अतिशय उत्तम होतील हे पाहीले. तसेच इयत्ता चौथीच्या अभ्यासक्रमात अंतर्भूत अध्ययन निष्पत्ती यातून साध्य करण्याचा प्रयत्न केला.

अशाप्रकारे 25 कविता पाठांतर करून घेवून. विद्यार्थ्यांचा इंग्रजी भाषेतील कौशल्यावर श्रवण, वाचन, लेखन, संभाषण यावरील विविध क्रिया कृतींचा वरील प्रमाणे सराव घेतला. यासाठी एकूण दोन महिन्यांचा कालावधी निर्धारित करण्यात आला. त्यानंतर इयत्ता चौथीच्या विद्यार्थ्यांची इंग्रजी भाषा


Copyright © | JET Network, All Rights Reserved

Journal of East-West Thought
ISSN: *2168-2259 (online)*
*(https://jetjournal.us/)*
Volume 15, Issue 2, April-June – 2025 Special Issue 1
Impact Factor: 7.665, Peer Reviewed and UGC CARE I

कौशल्यावर आधारित 30 मार्कांची उत्तर चाचणी घेण्यात आली. विद्यार्थ्यांनी पूर्व चाचणीत मिळविलेले गुण व उत्तर चाचणीत मिळविलेले गुण यांची नोंद करण्यात आली.

**12. संकलित माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वाचन :-**

प्राप्त माहितीचे विश्लेषण करण्यात आले व पूर्व चाचणी व उत्तर चाचणी यांची तुलना करुन काढण्यात आला.

| चाचणी | एकूण विद्यार्थी | मध्यमान | प्रमाणविचलन | Table 't' value | Calculated 't' value | Significance | Remarks |
|---|---|---|---|---|---|---|---|
| पूर्व चाचणी | 35 | 14.3 | 2.26 | 1.70 | 2.24 | 0.05 | स्विकार |
| उत्तर चाचणी | | 24.7 | 1.24 | | | | |

**निरीक्षण व अर्थनिर्वचन :**

वरील तक्तामध्ये स्वाधीनता मात्रा ३३ साठी ०.०५ सार्थकता स्तरावर संख्याशास्त्रीय टेबल नुसार नमुना 't' मूल्य १.७० आहे व प्राप्त 't' मूल्य २.२४ आहे. तर पूर्व चाचणी व उत्तर चाचणीचे मध्यमान अनुक्रमे हे १४.३ व २४.७ आहे तर पूर्व चाचणी व उत्तर चाचणीचे प्रमाण विचलन अनुक्रमे हे २.२६ व १.२४ आहे. प्राप्त 't' मूल्य २.२४ असून ते नमुना 't' मूल्य १.७० मूल्यापेक्षा जास्त आहे. म्हणून शून्य परिकल्पनेचा त्याग करावा लागेल. म्हणजे विद्यार्थ्यांच्या भाषा कौशल्य विकासाच्या पूर्व चाचणी व उत्तर चाचणीतील गुणात सार्थक फरक आढळत नाही. या परिकल्पनेचा त्याग करावा लागेल. म्हणजे पूर्व चाचणी व उत्तर चाचणीतील गुणात सार्थक फरक आढळून आला.

**13.निष्कर्ष:**

1. पारंपारिक पद्धतीने विद्यार्थ्यांना अध्यापन केले असता विद्यार्थ्यांना त्या आशयाचे पुरेशी आकलन होत नाही परंतू ज्ञानरचनावादी पध्दतीने अध्यापन केले असता आकलन चांगले होते.
2. पारंपारिक पद्धतीने इंग्रजी भाषेचे फक्त स्पेलिंग पाठ होतात किंवा उतारे पाठ होतात मात्र त्यातून इंग्रजीतून वाक्यरचना करणे, संभाषण करणे, व्यवहारात इंग्रजी भाषेचा उपयोग करणे या प्रकारचे उपयोजनात्मक कौशल्य विकसित होत नाहीत त्यासाठी ज्ञानरचनावादी पद्धत अधिक उपयुक्त ठरते.
3. विद्यार्थ्यांकडून इंग्रजी कविता (rhymes) पाठांतर करून घेतल्यानंतर, ज्ञानरचनावादानुसार कृतीयुक्त सादरीकरण केल्यामुळे वाक्यांचे अर्थ त्यांना स्पष्ट होतात.
4. विद्यार्थी स्वत: कृती करतात म्हणून कवितेतील ओळींचा इंग्रजी वाक्यरचनेत ते उपयोग करतात त्यामुळे भाषा कौशल्य विकासास मदत होते.
5. पाठांतराची क्षमता वाढते, सुरुवातीला कोणतीही इंग्रजी कविता (rhyme) पाठांतर करताना त्यांना आठ दिवस लागत होते नंतरच्या कविता ते दोनच दिवसात किंवा एका दिवसातच पाठ करू शकतात.
6. इंग्रजी भाषेच्या vocabulary त लक्षणीय वाढ होते.

**संदर्भ ग्रंथ सूची:**


Copyright © | JET Network, All Rights Reserved

Journal of East-West Thought
ISSN: *2168-2259 (online)*
*([https://jetjournal.us/](https://jetjournal.us/))*
Volume 15, Issue 2, April-June – 2025 Special Issue 1
Impact Factor: 7.665, Peer Reviewed and UGC CARE I

1. प्राचीन भारतीय शिक्षण पद्धती-अनंत सदाशिव आळतेकर,सुविचार प्रकाशन (1935), नागपूर
2. प्राचीन भारतीय शिक्षण पद्धती-डॉक्टर विलास जाधव
3. भारतीय इतिहासाचा अभ्यास-कोसंबी डी.डी.,डायमंड पब्लिकेशन, पुणे
4. आजचे शिक्षण आजच्या समस्या-विद्या प्रकाशन,पुणे
5. शैक्षणिक संशोधन मुलतत्वे(1978) – मुळे श.स. व उमाठे वि.तू.
6. Maharashtra Ellipse - British Council, Government of Maharashtra 2012
7. शिक्षक प्रशिक्षण मार्गदर्शिका (2013-14) - राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद,पुणे-30
8. प्राथमिक शिक्षण अभ्यासक्रम(2012) - विद्या परिषद,पुणे
9. पहिलीपासून इंग्रजी प्रेरक विचार(2001) - मोरे रामकृष्ण,महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद,पुणे
10. संशोधन पद्धती व तंत्रे - कोठारी सी.आर. - नवयुग प्रकाशन
11. इंग्रजी विषय अध्यापन पद्धती(2000) - झांबरे एम.ए. - सुविचार प्रकाशन मंडळ,पुणे
12. My English book one 2015
13. My English book Two 2015
14. My English book three 2015
15. My English book four 2015
16. My English book five 2015 – महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व संशोधन संशोधन मंडळ,पुणे


Copyright © | JET Network, All Rights Reserved